# बृहन्मुंबईमहानगरपालिका

शेठव्ही.सी.गांधीआणिएम.ए.व्होरामहानगरपालिकासर्वसाधारणरूग्णालय, राजावाडी, घाटकोपर (पू.), मुंबई – ४०००७७.

**क्र. एचओ/आरजीएच/ २०५४२ /आस्था - ०१दिनांक ११/१२/२०२३**

## सूचना

राजावाडी रूग्णालयाच्या आस्थापनेवरील औषधनिर्माता या संवर्गाची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता खालील अर्हता प्राप्त असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

- **भरावयाची एकूण पदे**:- **०५**
- **मानधन** :- **रू.१८,०००/-**
- **शैक्षणिक अर्हता**:- **राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदवीका** D. Pharmacy **किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मसी पदवी** (B. Pharmacy)
  **महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा.**
  **संगणक ज्ञाण असावे.** (MS-CIT **उत्तीर्ण असावे.**)
  **मराठी परिक्षा १०० गुणांची उत्तीर्ण असावे.**
- **अर्ज करण्याचा कालावधी** :- दि.११.१२.२०२३ ते दि.१५.१२.२०२३
- **मुलाखतीचा दिनांक** :- दि.२१.१२.२०२२ सकाळी ११.०० वाजता

अर्जदारांनी अर्ज **दि.११**.१२.२०२३ **ते दि.१५**.१२.२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत राजावाडी रूग्णालय, घाटकोपर (पूर्व) येथे सादर करावयाचे आहेत. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. (**अर्जा सोबतची कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत.**)

सदर नियुक्ती **निव्वळ कंत्राटी तत्वावर सहा महिन्यांच्या** कालावधीकरिता अथवा सदर पदांवर कायम तत्वावर उमेदवार प्राप्त होईपर्यंत या पैकी जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी असेल. त्यांना महानगरपालिका कर्मचा-याप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

**अटी व शर्ती** सोबत जोडल्या आहेत.

सही/-

**वैद्यकीय अधिक्षक**

**राजावाडी रूग्णालय, घाटकोपर**

**अर्हता** –

- उमेदवाराकडे राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील D. Pharmacy **किंवा**मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मसीमधील **पदवी (Degree in Pharmacy)** असणे आवश्यक आहे.
- उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा.
- उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परिक्षा व तत्सम परिक्षा किमान ५० गुणांचा किंवा १०० गुणांचा (उच्चस्तर/निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
- उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**मानधन** - औषधनिर्माता यांना रू. १८,०००/- प्रती महिना एवढे निश्चित मानधन (परिश्रामिक) देण्यात येईल त्यांना कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत. (सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त ६ महिन्यांचा राहील व प्रत्येकी ४५ दिवसानंतर १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल.)

**वयोमर्यादा** - उमेदवाराचे वय अर्ज करताना १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**औषधनिर्माता यांची कर्तव्य**

- आपल्या ताब्यातील औषधाचा साठा व इतर तत्सम वस्तुंचा साठा ठराविक कालावधीने तपासुन पाहणे.
- इंजेक्श्न व औषधे यांची मागणी व पुरवठा पडताळून पाहणे. तसेच ते योग्य जागी योग्य त-हेणे साठवून ठेवणे.
- योग्य औषध पुरवठा न करणा-या ठेकेदारांविरूध्द रिस्क कॉस्टची कारवाई करणे.
- महागडी औषधे व इंजेक्शनसयांचा लेखी हिशोब ठेवणे.
- मिळालेल्या औषधांच्या पावत्यांच्या खरेपणाचा दाखला घेणे.
- अचल वस्तुंची नोंद ठेवणे.
- औषधलयातील नोंद पुस्तके व्यवस्थितपणे नोंद करून ठेवणे तसेच ठराविक कालावधीने ती परत तपासणे.
- कालावधी संपुष्टात आलेल्या औषधांची नोंद पुस्तकात करून ते दर आठवड्याने तपासून पाहणे.
- एम.सी.जी.एम. हा शिक्का प्रत्येक औषधावर मारलेला आहे ह्याची शहानिशा करणे.
- सर्व प्रकारची औषधे सामान ठेवण्याच्या फळ्यांवर व्यवस्थितरीत्या साठवुन ठेवणे तसेच ते वाटण्यासाठी, तपासणीसाठी सहजपणे उपलब्ध करून देणे इत्यादी.
- रूग्णांना तसेच आंतररूग्ण विभागांना औषधांचे वाटप करणे.
- वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे.

**अटी व शर्ती**

- कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या औषधनिर्माता यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.
- कराराच्या कालावधीत कंत्राटी पध्दतीवरील औषधनिर्माता यांना १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा सादर करावे लागेल.
- औषधनिर्माता यांना प्रति माहे रू.१८,०००/- प्रति महिना मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.
- तसेच सदर पदे विश्ष्टि कालावधीसाठीच असून सदर पद कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल.
- नेमणुकीच्या विहित कालावधीत विवक्षीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या औषधनिर्माता यांची राहील.
- कराराच्या कालावधीत संबंधित औषधनिर्माता यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीमधील नियम लागू राहणार नाही. ही नेमणूक निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असेल.
- कंत्राट पध्दतीचे काम करणा-या औषधनिर्माताचे काम कराराच्या कालावधीमध्ये जर असामाधानकारक असेल तर औषधनिर्मातांची कंत्राट पध्दतीवरील नियुक्ती, कोणतीही पूर्व सुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.
- निवड प्रक्रीया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची कंत्राटी नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
- निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूकत्र् नियम १९९९ लागू होणार नाहीत.
- सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त ६ महिन्याचा राहील. (प्रत्येकी ४५ दिवसानंतर १ दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.)
- कंत्राट कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सदर सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही. तसेच त्यांची सेवा त्यांना पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.

**निवडीचे निकष –**

- शैक्षणीक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.
- समान गुण धारण करणा-या अर्हता प्राप्त उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल. व (पदवीस प्राधान्य देण्यात येईल.)
- संबंधित विषयातील आवश्यक ती पदविका प्राप्त केल्यानंतर उमेदवारास अनुभव असल्यास प्राधान्य प्राधान्य देण्यात येईल.

**उमेदवरांनी अर्ज करावयाचे ठिकाण**

वैद्यकीय अधिक्षक,

राजावाडी रूग्णालय, घाटकोपर

घाटकोपर, मुबई – ४०० ००७.